**वैद्यकीय शिक्षण विभागांतर्गत उत्कृष्टता केंद्रे (Centers of Excellence) स्थापन करण्याच्या अनुषंगाने धोरण निश्चित करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-२०२३/प्र. क्र. ४१७/२३/शिक्षण-१**
नवीन मंत्रालय, गोकुळदास तेजपाल रूग्णालय संकुल,
नववा मजला, लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई- ४०० ००१
तारीख: १२ ऑक्टोबर, २०२३

**प्रस्तावना -**

राज्यातील सर्व नागरिकांना दर्जेदार व किफायतशीर दरात आरोग्य सुविधा उपलब्ध व्हाव्यात, यासाठी राज्यातील आरोग्य सेवा क्षेत्रात सुधारणा करण्यावर राज्य शासनाने कायम भर दिला आहे. या अंतर्गत वैद्यकीय शिक्षण व तृतीयक आरोग्य सुविधा सुधारणे तसेच राज्यात नवीन वैद्यकीय महाविद्यालयांचे बांधकाम, कार्यान्वयन व संल्लग्नित रुग्णालयांच्या श्रेणीवर्धनासाठी आशियाई विकास बँकेमार्फत निधी उपलब्ध करून घेण्यात येत आहे. सदर निधी उपलब्ध करून घेण्यासाठी विविध धोरणात्मक बाबींवर निर्णय घेणे आवश्यक आहे. त्यामध्ये वैद्यकीय शिक्षण विभागांतर्गत उत्कृष्टता केंद्रांची (Centers of Excellence) स्थापना करण्याची बाब समाविष्ट आहे. यास्तव राज्यातील शासकीय वैद्यकीय, दंत, आयुर्वेदिक तसेच होमिओपॅथी महाविद्यालयांना वैद्यकीय शिक्षण, संशोधन व रुग्णोपचारासाठी जागतिक दर्जाच्या संस्थांमध्ये रुपांतरीत करून राज्यातील आरोग्य सेवेची गुणवत्ता सुधारण्यासाठी उत्कृष्टता केंद्रे स्थापन करण्याच्या अनुषंगाने धोरण निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय-**

राज्यातील आरोग्य सेवा क्षेत्रात सर्वांगीण सुधारणा करण्यासाठी उत्कृष्टता केंद्रे (Centers of Excellence) स्थापन करण्याच्या संदर्भातील धोरणास शासन मान्यता देण्यात येत आहे. सदर धोरणाची उद्दिष्टे व इतर तरतूदी पुढील प्रमाणे राहतील:-

१) **धोरणाची उद्दिष्टे**:-

१) **शिक्षण व कौशल्य विकास**:- सद्यस्थितीत लागू असलेले निकष तसेच निकषांमध्ये वेळोवेळी होणा-या सुधारणांच्या अनुषंगाने अभ्यासक्रम व अध्यापनासाठी नव-नवीन कल्पना राबवणे, कर्मचाऱ्यांच्या कौशल्यात वाढ करणे.

२) **वैद्यकीय संशोधन**:- वैद्यकीय क्षेत्रातील संशोधनासाठी आवश्यक दृष्टिकोन विकसित करणे. तसेच या अंतर्गत आवश्यक क्लिनिकल चाचण्या घेता याव्यात, यासाठी आवश्यक नियमावली निश्चित करणे.

३) **दर्जेदार वैद्यकीय सेवेची उपलब्धता**- उपलब्ध सुविधांच्या गुणवत्तेत वाढ करून दर्जेदार वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देणे.

२) **संस्थात्मक संरचना**:-

१. राज्यातील “सेंटर्स ऑफ एक्सलन्स” (उत्कृष्टता केंद्र) ची निर्मिती Hub & Spokes Model च्या धर्तीवर करण्यात यावी.
२. सदर धोरणाची अंमलबजावणी तसेच प्रमुख उत्कृष्टता केंद्र (Hub) व इतर उत्कृष्टता केंद्रांचे (Spokes) नियंत्रण महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांच्यामार्फ़त करण्यात यावे.

३. सदर संरचनेत उत्कृष्टता केंद्रे म्हणून सार्वजनिक तसेच खाजगी वैद्यकीय संस्था, सार्वजनिक तसेच खाजगी संशोधन संस्था/ निधी तसेच वैद्यकीय संशोधन, शिक्षण व सेवा यांचा दर्जा वाढविण्यासाठी योगदान देऊ शकणा-या कोणत्याही संस्थेचा समावेश करता येईल.

४. महाराष्ट्र पदव्युत्तर वैद्यकीय शिक्षण व संशोधन संस्था, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक हे प्रमुख उत्कृष्टता केंद्र (Hub) म्हणून कार्य करील.

५. सद्यस्थितीत राज्यातील पुढील शासकीय वैद्यकीय महाविद्यालये उत्कृष्टता केंद्रे (Spokes) म्हणून कार्य करतील:-

१) ग्रॅन्ट मेडिकल महाविद्यालय व सर ज. जी. रुग्णालय समूह, मुंबई
२) बी. जे. वैद्यकीय महाविद्यालय, पुणे
३) डॉ. वैशंपायन मेमोरियल शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,सोलापूर
४) श्री. भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धुळे
५) श्री. वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, यवतमाळ
६) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर
७) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर

६. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठास शासनाच्या पूर्व-परवानगीने आवश्यकतेनुसार अधिक उत्कृष्टता केंद्रांना मान्यता देता येईल. तसेच तंत्रज्ञान हस्तांतरण, संयुक्त संशोधन, नवीन कल्पनांची देवाण-घेवाण इ. बाबतीत मार्गदर्शन प्राप्त करून घेण्याकरिता महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठास राष्ट्रीय स्तरावरील संस्था, खाजगी संस्था, आंतरराष्ट्रीय संस्थांसोबत विहित कार्यपद्धतीचा अवलंब करून भागीदारी करता येईल.

३) राज्यातील उत्कृष्टता केंद्रांद्वारे पुढील उपक्रम राबविण्यात येतीलः-

१. **वैद्यकीय शिक्षण व सेवांतर्गत कौशल्य विकासः-**

i. **वैद्यकीय शिक्षणः**- वैद्यकीय शिक्षणाबाबत त्या त्या वेळेस लागू असलेली मार्गदर्शक तत्त्वे विचारात घेऊन वैद्यकीय अभ्यासक्रमात सदर क्षेत्राशी संबंधीत इतर पूरक विषय (उदा. कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence) आधारीत निदान पद्धती) तसेच अचिकित्सालयीन अभ्यासक्रम (उदा. जैववैद्यकीय क्षेत्रातील टाकाऊ पदार्थांची हाताळणी) यांचा समावेश करणे.

ii. **अध्यापन पद्धती विकासः**- पारंपारिक शिक्षण पद्धती सोबत ऑगमेंटेड रिॲलिटी (AR)/ व्हर्च्युअल रिॲलिटी (VR) सारख्या नाविन्यपूर्ण पद्धती तसेच थेट ऑनलाइन सत्रे यांचा वापर करून सिम्युलेशन-आधारित वैद्यकीय शिक्षणाच्या प्रभावशाली अध्यापन पद्धती विकसित करून परिणामकारक शिक्षणास गती देणे.

iii. **सेवांतर्गत कौशल्य विकासः-** सेवांतर्गत वैद्यकीय अधिकारी/ कर्मचा-यांसाठी तांत्रिक कौशल्य (अनुभवावर आधारीत) तसेच व्यवस्थापकीय पद स्वीकारण्यापूर्वी आवश्यक प्रशिक्षण अभ्यासक्रमांची निर्मिती करणे. (उदा. नवीन वैद्यकीय उपकरणांबाबत प्रशिक्षण

देण्यासाठी विशेष आरोग्य तंत्रज्ञान प्रशिक्षण इ.) यासाठी आवश्यकतेनुसार महाविद्यालयीन स्तरावर तसेच राज्य व देशस्तरावर मार्गदर्शनपर सत्रे आयोजित करणे.

२. **वैद्यकीय संशोधनः-**

i. राज्यातील तसेच देशातील आरोग्यसेवेतील प्राधान्यांच्या आधारे उत्कृष्टता केंद्रांमार्फ़त संशोधनाची क्षेत्रे निश्चित करण्यात येतील. यामध्ये निदानशास्त्र (Diagnostics), उपचारशास्त्र तसेच संबंधीत लसी यांवर प्रामुख्याने लक्ष केंद्रित करण्यात येईल.

ii. विषयाधारीत संशोधनाबाबत विशेष लक्ष देण्यात येईल. (उदा. राज्य / देशासमोर आव्हान म्हणून उभ्या राहिलेल्या विविध आजारांवरील मूलभूत संशोधन)

iii. उत्कृष्टता केंद्रांमध्ये रोबोटिक शस्त्रक्रिया उपकरणे, वैद्यकीय शिक्षण व कौशल्यासाठी ऑगमेंटेड रिॲलिटी (AR)/ व्हर्च्युअल रिॲलिटी (VR) आधारीत सिम्युलेशन प्रयोगशाळा अशा सुविधा उपलब्ध करून दिल्या जातील.

iv. उत्कृष्टता केंद्रांमध्ये पदव्युत्तर आणि पीएचडी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांसाठी तसेच व्यावसायिक शास्त्रज्ञांसाठी स्वतंत्र संशोधन केंद्र विकसित करण्यात येईल. तसेच आवश्यक प्रशिक्षण आणि मार्गदर्शन प्रदान केले जाईल.

v. वैद्यकीय शिक्षण घेणारे विद्यार्थी व प्राध्यापकांना उत्कृष्टता केंद्रांमधील अत्याधुनिक प्रयोगशाळा आणि ग्रंथालये संशोधनासाठी उपलब्ध करून दिली जातील.

vi. सदर केंद्रांतील संशोधक तसेच शास्त्रज्ञांनी संशोधन केलेल्या बाबींवरील कागदपत्रांचे प्रकाशन सुलभरित्या करण्यासाठी माहितीचे विश्लेषण, आवश्यक कायदेशीर पाठबळ आणि बौद्धिक संपदा संरक्षण या संदर्भातील मार्गदर्शन संबंधीतांना उत्कृष्टता केंद्रांमार्फ़त देण्यात येईल.

३. **दर्जेदार वैद्यकीय सेवाः-**

i. **उपचार पद्धतींबाबत मार्गदर्शक तत्त्वे निश्चित करणे**- यामध्ये एपिडेमिओलॉजी, बायोमार्कर्स, जोखीम घटक, लक्षणे, निदान आणि विविध रोगांचे उपचार यांची तपशीलवार माहिती असेल. राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर प्रकाशित होणाऱ्या प्रमाणित उपचार मार्गदर्शक तत्त्वांवर सदर मार्गदर्शक तत्त्वे आधारीत असतील. तसेच तज्ज्ञांच्या मतांवर आधारित सुधारणांचा देखील यामध्ये समावेश करण्यात येईल. यासाठी आवश्यकतेनुसार उत्कृष्टता केंद्रांतील तज्ज्ञांसह बाह्य तज्ज्ञांचा गट स्थापन करून त्यांचे सहकार्य घेण्यात येईल.

ii. सदर मार्गदर्शक तत्त्वांचे वेळोवेळी परीक्षण करण्यात येईल.

४) **निधी उपलब्धताः -**

i. प्रत्येक आर्थिक वर्षात विशिष्ट निधी उत्कृष्टता केंद्रांसाठी शासनामार्फ़त अर्थसंकल्पित करण्यात येईल. शासनामार्फ़त सदर निधी महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांच्याकडे वर्ग करण्यात येईल.

ii. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांना आशियाई विकास बँक, जागतिक विकास बँक तसेच आंतरराष्ट्रीय नाणेनिधी अशा आंतरराष्ट्रीय संस्थांमार्फ़त तसेच कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी (CSR) अंतर्गत निधी उभारता येईल.

iii. संशोधनाच्या प्रगत टप्प्यात Venture Capital च्या माध्यमातून निधी उभारणीसाठी प्रयत्न करता येईल.

५) सदर धोरणाशी संबंधीत तपशीलवार मार्गदर्शक तत्त्वे यथावकाश शासनामार्फ़त निर्गमित करण्यात येतील.

६) **सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या** www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२३१०१२१८१७२०४११३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

AJIT TUKARAM SASULKAR

Digitally signed by AJIT TUKARAM SASULKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=MEDICAL EDUCATION AND DRUGS DEPARTMENT, 2.5.4.20=09df106c443b4977e7463338fa58f736fdb4fe137863b178345a5ead34dbfb12, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=71214F99804ABAAE1EA28D5F794C1BA337889880D0C567C29D025934340956DF, cn=AJIT TUKARAM SASULKAR
Date: 2023.11.03 12:43:40 +05'30'

**(अजित सासुलकर)**
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राज्यपाल सचिवालय, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२. मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद मुंबई यांचे सचिव, विधान भवन, मुंबई.
३. मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, मुंबई यांचे सचिव, विधान भवन, मुंबई.
४. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा. उप मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. मा. मंत्री, वैद्यकीय शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
७. मा.मंत्री (सर्व), महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
८. मा. विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव, विधानभवन, मुंबई.
९. मा. विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव, विधानभवन, मुंबई.
१०. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
११. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.
१२. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३. आयुक्त, वैद्यकीय शिक्षण, मुंबई.
१४. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.
१५. संचालक, आयुष संचालनालय, मुंबई.

१६. संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.
१७. कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
१८. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) १ / २ महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर.
१९. जिल्हा कोषागार अधिकारी (संबंधित)
२०. सर्व अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालये.
२१. सर्व सह सचिव/उप सचिव/अवर सचिव/कार्यासन अधिकारी, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.
२२. कार्यासन शिक्षण -२, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,
२३. निवडनस्ती (शिक्षण-१).